ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 28 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## चक्रिवादळाचं तांडव, तामिळनाडू उसळल्या उंच लाटा, रिक्षा, स्कुटी गेल्या वाहून





पान 3 वरुन...

इमारतींचा सुळसुळाट, पण पाण्याचा ठणठणाट!

### पदवीधर-शिक्षकांच्या कौलाकडे राज्याचे लक्ष; निकालाची उत्सुकता शिगेला

# महायुती-मविआत 'कांटे की टक्कर!'

महाईन्यूज । पुणे

**महाराष्ट्र विधान परिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांतील निवडणुकीमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या ठरलेल्या या निवडणुकीत पाच जागांवर कोण बाजी मारणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. २३ ऑक्टोबर रोजी मतदान पार पडल्यानंतर मंगळवारी, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी सुरू झाली. एकूण १८२ उमेदवार रिंगणात असल्याने आणि पसंतीक्रमानुसार मतमोजणी होत असल्याने अंतिम निकालाचे गणित गुंतागुंतीचे ठरत आहे. पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर पदवीधर तसेच पुणे आणि अमरावती शिक्षक मतदारसंघांमध्ये ही निवडणूक होत आहे. या पाचही जागांचे निकाल केवळ उमेदवारांचे राजकीय भवितव्य ठरवणारे नसून, पदवीधर आणि शिक्षक मतदारांमधील सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या संघटनात्मक ताकदीचे चित्रही समोर आणणारे ठरणार आहेत.**

## वाढलेल्या मतदानामुळे दोन्ही बाजूंची धाकधूक

या निवडणुकीत पाचही मतदारसंघांत मिळून सरासरी ७२.९६ टक्के मतदान झाल्याचे वृत्त आहे. अमरावती शिक्षक मतदारसंघात सर्वाधिक मतदानाची नोंद झाली, तर पुणे शिक्षक मतदारसंघातही मतदानाचा टक्का लक्षणीय राहिला. पुणे पदवीधर मतदारसंघात ६२.७८ टक्के आणि पुणे शिक्षक मतदारसंघात ८५.८७ टक्के मतदान झाले. वाढलेल्या मतदानाचा फायदा नेमका कोणाला होणार, हा आता चर्चेचा विषय आहे. मात्र, मतदानाची टक्केवारी वाढली म्हणजे एखाद्या विशिष्ट पक्षाला किंवा आघाडीला फायदा झाला, असा थेट निष्कर्ष काढता येत नाही. मतदारांचा कल, उमेदवारांची वैयक्तिक ताकद, स्थानिक समीकरणे आणि पसंतीक्रमातील मतांचे हस्तांतरण या सर्व बाबी निकालावर प्रभाव टाकू शकतात.




## नागपूर आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये चुरस

नागपूरमध्ये भाजपचे सुधाकर कोहळे आणि काँग्रेसचे अभिजीत वंजारी यांच्यात, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये सतीश चव्हाण, प्रतापसिंह पाटील आणि दिलीप घुगे यांच्यातील लढतीकडे लक्ष लागले आहे. पसंतीक्रमातील मतांचे हस्तांतरण आणि अंतिम मतमोजणी या दोन्ही मतदारसंघांतील निकालासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

## पुणे-अमरावती शिक्षक मतदारसंघांत बहुरंगी लढत

पुण्यात कौस्तुभ गावडे, जयंत आसगावकर, सचिन सानप आणि दत्तात्रय सावंत यांच्यात चुरस आहे. तर अमरावतीत किरण सरनाईक, अदिती पोहरे यांच्यासह अन्य उमेदवार मैदानात आहेत. महायुतीतील मतविभाजन, स्थानिक राजकीय समीकरणे आणि पसंतीक्रमातील मतांचे हस्तांतरण निकालासाठी निर्णायक ठरणार आहे.

## पसंतीक्रमाच्या मतांमुळे अंतिम निकालाला वेळ

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील निवडणुकीत पसंतीक्रमानुसार मतमोजणी केली जाते. पहिल्या पसंतीची मते मोजल्यानंतर एखाद्या उमेदवाराला आवश्यक विजयाचा कोटा मिळाला नाही, तर नियमानुसार कमी मते मिळालेल्या उमेदवाराला बाद करून त्याच्या मतपत्रिकांवरील पुढील पसंतीची मते हस्तांतरित केली जाऊ शकतात. त्यामुळे पहिल्या फेरीत आघाडी मिळवणाऱ्या उमेदवाराचा विजय निश्चित झाला, असे मानता येत नाही. वैध मतांची अंतिम संख्या, विजयासाठी आवश्यक कोटा आणि पुढील पसंतींच्या मतांचे हस्तांतरण यांनंतरच निकालाचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## पुणे पदवीधरमध्ये भाजप विरुद्ध राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार)

पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपच्या डॉ. स्मिता जाधव आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हर्षदा देशमुख-जाधव यांच्यातील लढतीकडे विशेष लक्ष लागले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सुनील मोदी यांच्यासह इतर उमेदवारही रिंगणात असल्याने मतविभाजनाचे गणित महत्त्वाचे ठरणार आहे.या मतदारसंघात ४७ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये आघाडी असली तरी विजयासाठी आवश्यक मतांचा कोटा गाठला जातो का, हे निर्णायक ठरणार आहे. पहिल्या फेरीतील आकडे आणि अंतिम निकाल यांत फरक पडण्याची शक्यता असल्याने मतमोजणीच्या प्रत्येक टप्प्याकडे लक्ष आहे.

## पसंतीक्रमाच्या मतांमुळे अंतिम निकालाला वेळ

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील निवडणुकीत पसंतीक्रमानुसार मतमोजणी केली जाते. पहिल्या पसंतीची मते मोजल्यानंतर एखाद्या उमेदवाराला आवश्यक विजयाचा कोटा मिळाला नाही, तर नियमानुसार कमी मते मिळालेल्या उमेदवाराला बाद करून त्याच्या मतपत्रिकांवरील पुढील पसंतीची मते हस्तांतरित केली जाऊ शकतात. त्यामुळे पहिल्या फेरीत आघाडी मिळवणाऱ्या उमेदवाराचा विजय निश्चित झाला, असे मानता येत नाही. वैध मतांची अंतिम संख्या, विजयासाठी आवश्यक कोटा आणि पुढील पसंतींच्या मतांचे हस्तांतरण यांनंतरच निकालाचे चित्र स्पष्ट होणार आहे.

# दिवाळीच्या गर्दीमुळे पुण्यात वाहतुकीला 'ब्रेक'

## सकाळी ९ ते रात्री ९ मालवाहतुकीवर बंदी; व्यापारी पेठांमध्ये दिवसा मालवाहू वाहनांना नो एन्ट्री!

**महाईन्यूज । पुणे**

**दिवाळीच्या खरेदीसाठी पुणे शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये नागरिकांची गर्दी वाढू लागल्याने वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील व्यापारी पेठांमध्ये सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. व्यापारी आणि मालवाहतूकदारांनी रात्री ९ ते सकाळी ९ या वेळेतच मालाची चढ-उतार करावी, असे आदेश वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी दिले आहेत. हे निर्बंध १२ नोव्हेंबरपर्यंत लागू राहणार आहेत.**




दिवाळीच्या पार्श्वभूमीवर लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, टिळक रस्ता, बाजीराव रस्ता, महात्मा फुले मंडई, शनिपार, तुळशीबाग, रविवार पेठेतील बोहरी आळी, गणेश पेठ, शुक्रवार पेठ, बुधवार पेठेतील पासोड्या विठोबा चौक, मोती चौक आणि तपकीर गल्ली परिसरात खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. शहरासह उपनगर आणि जिल्ह्यातील नागरिक कपडे, दागिने, सजावटीचे साहित्य आणि इतर वस्तूंच्या खरेदीसाठी या बाजारपेठांमध्ये येत आहेत. त्यामुळे रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण वाढत असून, दिवसा मालवाहू वाहनांमधून माल उतरविल्यास वाहतूक कोंडीची समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

ही बाब लक्षात घेऊन वाहतूक पोलिसांनी सोमवार, २६ ऑक्टोबरपासून मध्यवर्ती व्यापारी पेठांमध्ये दिवसा मालवाहू वाहनांना बंदी घातली आहे. व्यापाऱ्यांना मालपुरवठा सुरळीत व्हावा आणि नागरिकांना खरेदीदरम्यान वाहतुकीचा त्रास होऊ नये, यासाठी रात्री ९ ते सकाळी ९ ही वेळ मालवाहतुकीसाठी निश्चित करण्यात आली आहे.

दरम्यान, दिवाळीच्या गर्दीमुळे शहराच्या मध्यवर्ती भागात शनिवार आणि रविवारी जड वाहनांना देण्यात आलेली विशेष परवानगीही तात्पुरती रद्द करण्यात आली आहे. यापूर्वी बांधकाम क्षेत्राशी संबंधित वाहने आणि अन्य जड वाहनांना आठवड्याच्या शेवटी काही प्रमुख रस्त्यांवरून वाहतुकीची परवानगी देण्यात आली होती. मात्र, दिवाळीच्या खरेदीसाठी वाढणारी गर्दी लक्षात घेऊन छत्रपती शिवाजी महाराज रस्ता, बाजीराव रस्ता आणि इतर प्रमुख मार्गांवरील जड वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

विशेषतः शनिवार आणि रविवारी बाजारपेठांमध्ये खरेदीदारांची मोठी गर्दी होत असल्याने पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. तसेच जड वाहनांमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होऊन कोंडी वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे दिवाळी संपेपर्यंत मध्यवर्ती भागात जड वाहनांना प्रवेशबंदी कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी व्यापारी, मालवाहतूकदार आणि वाहनचालकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. तसेच नागरिकांनी बाजारपेठांमध्ये जाताना वाहतूक व्यवस्थेतील बदल लक्षात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी केले आहे.

### मालवाहू वाहनांसाठी नवे वाहतूक निर्बंध

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील लक्ष्मी रस्ता, तुळशीबाग, मंडई, शनिपार, बाजीराव रस्ता, कुमठेकर रस्ता यांसह प्रमुख व्यापारी पेठांमध्ये सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. व्यापाऱ्यांना रात्री ९ ते सकाळी ९ या वेळेतच मालाची चढ-उतार करता येणार आहे. तसेच शनिवार आणि रविवारी जड वाहनांना देण्यात आलेली विशेष परवानगीही तात्पुरती रद्द करण्यात आली आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी हे निर्बंध १२ नोव्हेंबरपर्यंत लागू राहणार आहेत.

# पुणेकरांची तहान वाढवू नका; वाढीव पाणीकपातीविरोधात एल्गार!

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे शहरात सुरू असलेल्या पाणीकपातीत आणखी वाढ करण्याच्या हालचालींना सामाजिक संस्था आणि विरोधी पक्षांनी विरोध दर्शविला आहे. खडकवासला धरणसाखळीत २५.६६ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असून, सध्याची १३ टक्के पाणीकपात पुरेशी असल्याचा दावा सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी केला आहे. त्यामुळे पुणेकरांवर अतिरिक्त पाणीकपात लादण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.**



राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांना १० टक्के पाणीकपातीचे आदेश दिले आहेत. दरम्यान, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पुणे महापालिकेला २० टक्के पाणीकपात करण्याची सूचना केली आहे. याबाबत बुधवार, २८ ऑक्टोबर रोजी महापौर मंजूषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय गटनेत्यांची बैठक होणार आहे.

विवेक वेलणकर यांनी मांडलेल्या हिशेबानुसार, पुणे शहराला दरमहा सुमारे १.६ टीएमसी पाणी लागते. १५ ऑक्टोबर २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२७ या कालावधीत सुमारे १७.४० टीएमसी पाण्याची गरज भासेल. मात्र, दर गुरुवारी पाणीपुरवठा बंद ठेवल्याने सुमारे १३ टक्के बचत होत असून, शहराची पाण्याची गरज १५ टीएमसीपर्यंत मर्यादित राहू शकते. त्यामुळे सध्याची पाणीकपात कायम ठेवल्यास उपलब्ध साठा पुरेसा ठरेल, असा दावा त्यांनी केला.

दरम्यान, महापालिकेच्या समान पाणीपुरवठा योजनेवर गेल्या पाच वर्षांत सुमारे दोन हजार कोटी रुपये खर्च होऊनही पाणीगळती किती कमी झाली, याची माहिती जाहीर करण्यात यावी. तसेच या योजनेची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी, अशी मागणीही वेलणकर यांनी केली आहे.

शिवसेना (ठाकरे) पक्षाचे गटनेते नितीन गावडे आणि शहर सहसंपर्कप्रमुख गजानन थरकुडे यांनी आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याऐवजी दररोज एक तास पाणीपुरवठ्याची वेळ कमी करण्याच्या पर्यायाचा तांत्रिक अभ्यास करण्याची मागणी केली आहे. विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनीही वाढीव पाणीकपातीला विरोध दर्शवत पाणीगळती आणि गैरवापर रोखण्यावर महापालिकेने भर द्यावा, अशी भूमिका मांडली आहे.

वाढीव पाणीकपातीवरून प्रशासन आणि विरोधकांमध्ये मतभेद निर्माण झाले असून, बुधवारी होणाऱ्या सर्वपक्षीय बैठकीत काय निर्णय होणार, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

# इमारतींचा सुळसुळाट, पण पाण्याचा ठणठणाट!

## सहा महिन्यांत ६७२ गृहप्रकल्पांना मंजुरी; महापालिकेच्या तिजोरीत ३८३ कोटी

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार झपाट्याने होत असून, शहराच्या विविध भागांत मोठमोठे गृहप्रकल्प उभारले जात आहेत. चालू आर्थिक वर्षाच्या (२०२६-२७) पहिल्या सहा महिन्यांत महापालिकेने तब्बल ६७२ गृहप्रकल्प आणि घरांना बांधकाम परवानगी दिली आहे. या मंजुरीतून महापालिकेच्या तिजोरीत ३८३ कोटी ४८ लाख रुपयांचा महसूल जमा झाला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा महसुलात सुमारे ९५ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. मात्र, शहरातील वाढते नागरिकीकरण आणि गंभीर होत चाललेली पाणीटंचाई यामुळे नव्या गृहप्रकल्पांच्या मंजुरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरात सध्या निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक आणि मिश्र वापराच्या मालमत्तांसह सुमारे सात लाख ६६ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या पुढे गेल्याने पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधांवरील ताण वाढला आहे. गेल्या सात वर्षांपासून शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. त्यातच मोशी कचरा डेपोची क्षमता संपल्याने कचरा व्यवस्थापनाचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन बांधकामांसाठी जागा मर्यादित असून, सदनिकांचे दरही वाढले आहेत. त्यामुळे नागरिकांचा कल मोशी, चिखली, चऱ्होली, डुडुळगाव, रावेत, पुनावळे आणि ताथवडे या भागांकडे वाढला आहे. विशेषतः मोशी, चऱ्होली आणि डुडुळगाव परिसरात मोठ्या प्रमाणावर नवीन गृहप्रकल्प साकारत आहेत. या भागांमध्ये झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या तुलनेत मूलभूत सुविधांचा विस्तार होत नसल्याने भविष्यात नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

दरम्यान, कमी पर्जन्यमान आणि दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहरात दहा टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. आधीच एक दिवसाआड पाणीपुरवठा होत असताना नव्या गृहप्रकल्पांमुळे पाण्याची मागणी आणखी वाढणार आहे. त्यामुळे शहरातील पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत नवीन गृहप्रकल्पांना मंजुरी देऊ नये, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केली आहे. तसेच शहरातील अनधिकृत बांधकामांवर तत्काळ कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागाला चालू आर्थिक वर्षासाठी ९१० कोटी रुपयांच्या महसुलाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. पहिल्या सहामाहीत ६७२ गृहप्रकल्प आणि घरांना मंजुरी देऊन ३८३ कोटी ४८ लाख ८५ हजार रुपयांचा महसूल मिळाला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत हा महसूल ९५ कोटी रुपयांनी अधिक असल्याची माहिती महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिली.

एकीकडे नव्या गृहप्रकल्पांमधून महापालिकेच्या महसुलात मोठी भर पडत असताना दुसरीकडे वाढत्या लोकसंख्येला पुरेशा नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे राहिले आहे. त्यामुळे महसूलवाढीला प्राधान्य द्यायचे की नागरिकांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न आधी सोडवायचा, असा सवाल उपस्थित होत आहे.

### सुविधांचा प्रश्न मात्र कायम!

पिंपरी-चिंचवड महापालिकेने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत ६७२ गृहप्रकल्प आणि घरांना मंजुरी दिली असून, त्यातून ३८३ कोटी ४८ लाख रुपयांचा महसूल मिळविला आहे. मोशी, चऱ्होली, डुडुळगाव, चिखली आणि रावेत परिसरात मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्प उभारले जात आहेत. मात्र, शहरात गेल्या सात वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू असून, सध्या दहा टक्के पाणीकपातही लागू आहे. वाढत्या बांधकामांमुळे पाणीपुरवठा आणि कचरा व्यवस्थापनावरील ताण आणखी वाढण्याची शक्यता असल्याने नवीन गृहप्रकल्पांच्या मंजुरीबाबत फेरविचार करण्याची मागणी होत आहे.

# डेंग्यूचा डंख वाढला; ऑक्टोबरमध्ये सर्वाधिक ९० रुग्ण!

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहरात डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ होत असून, ऑक्टोबर महिन्यात सर्वाधिक ९० रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे जानेवारीपासून २५ ऑक्टोबरपर्यंत शहरातील एकूण डेंग्यूबाधितांची संख्या २१२ वर पोहोचली आहे. विशेषतः भोसरी, पिंपरी, चिंचवड, वाकड, थेरगाव, पिंपळे सौदागर, मोशी आणि चिखली परिसरात डेंग्यूचा प्रादुर्भाव अधिक असल्याचे समोर आले आहे.**



महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या माहितीनुसार, ऑक्टोबरमध्ये डेंग्यूच्या एक हजार ७२६ संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ९० जणांचे अहवाल सकारात्मक आले आहेत. शहरातील विविध भागांत सुरू असलेल्या गृहप्रकल्पांच्या बांधकामांमुळे साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती वाढत असल्याचे आरोग्य विभागाचे निरीक्षण आहे

दरम्यान, शहरात मलेरियाच्या एकूण ४१ रुग्णांची नोंद झाली असून, ऑक्टोबरमध्ये १३ रुग्ण आढळले आहेत. चिकुनगुनियाचे चार संशयित रुग्णही समोर आले आहेत. बदलत्या हवामानामुळे सर्दी, खोकला आणि तापाच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. दुसरीकडे, सप्टेंबरमध्ये ५८ असलेली स्वाइन फ्ल्यूची रुग्णसंख्या ऑक्टोबरमध्ये पाचवर आली आहे.

डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेने औषध फवारणी आणि सर्वेक्षण वाढविले आहे. महिन्याच्या सुरुवातीला रुग्णसंख्या वाढली होती. मात्र, आता त्याचे प्रमाण कमी होत असल्याचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले. नागरिकांनी घर आणि परिसरात पाणी साचू देऊ नये, स्वच्छता राखावी आणि ताप आल्यास तातडीने वैद्यकीय तपासणी करावी, असे आवाहन आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी केले आहे.

### डासांची उत्पत्ती वाढली!

शहरातील मोशी, चिखली, वाकड, थेरगाव आणि पिंपळे सौदागर परिसरात मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्पांची बांधकामे सुरू आहेत. या ठिकाणी साचणाऱ्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढत असल्याचे आरोग्य विभागाचे निरीक्षण आहे. त्यामुळे बांधकामांच्या ठिकाणी पाणी साचणार नाही याची खबरदारी घेण्यासह नागरिकांनी घरातील पाण्याच्या टाक्या, कुंड्या आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.



## भूमिका

**रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील टोरंट कंपनीच्या वीज प्रकल्पावरून सुरू झालेला वाद विकास आणि पर्यावरण यांच्यातील संघर्ष पुन्हा अधोरेखित करतो. राज्यात एन्रॉनपासून नाणार, जैतापूर, वाढवण बंदर आणि मुंबईतील मेट्रो प्रकल्पांपर्यंत अनेक प्रकल्पांना स्थानिकांनी विरोध केला आहे. अनेकदा या आंदोलनांना राजकीय पाठबळ मिळाले आणि सरकारशी संघर्ष निर्माण झाला.**

# ३२ हजार झाडांचा बळी; विकासाचा हा कसला न्याय?



कर्जतचा वादही त्याच दिशेने जात आहे. या प्रकल्पासाठी ३७७ हेक्टर जमीन आवश्यक असून, सुमारे तीन हजार मेगावॅट वीजनिर्मितीचे उद्दिष्ट आहे. मात्र, सायडोंगर वनक्षेत्रातील २३३ हेक्टर जंगलातील ३२ हजारांहून अधिक झाडे तोडली जाणार असल्याने पर्यावरणाच्या ऱ्हासाची भीती व्यक्त होत आहे. या जंगलात शेकरू, बिबटे, भेकर, उदमांजर यांसारख्या वन्यजीवांचा अधिवास आहे.

औषधी वनस्पती आणि समृद्ध जैवविविधतेमुळे या परिसराचे पर्यावरणीय महत्त्व मोठे आहे. त्यामुळे वृक्षतोडीला होणारा विरोध केवळ भावनिक नसून, निसर्गाच्या अस्तित्वाशी संबंधित आहे. विकासाच्या नावाखाली जंगल नष्ट करणे कितपत योग्य, हा प्रश्न सरकारने गांभीर्याने घेतला पाहिजे.दुसरीकडे, राज्याची वाढती विजेची गरजही नाकारता येणार नाही. पंप्ड स्टोरेज तंत्रज्ञानाद्वारे सौरऊर्जेचा वापर करून पाणी उंच जलाशयात साठवले जाते आणि गरजेच्या वेळी त्यातून वीज निर्माण केली जाते.

अशा प्रकल्पांमुळे स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जानिर्मितीला चालना मिळू शकते. मात्र, ऊर्जेची गरज भागवताना पर्यावरणाचे अपरिमित नुकसान होणार नाही, याची खबरदारी घेणे तितकेच आवश्यक आहे. माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पर्यायी जागेचा विचार करण्याची भूमिका मांडली आहे. सरकारने या सूचनेकडे राजकीय मतभेदांच्या पलीकडे जाऊन पाहिले पाहिजे. तज्ज्ञ समिती नेमून पर्यायी जागांची व्यवहार्यता, पर्यावरणीय परिणाम आणि आर्थिक खर्च यांचा तुलनात्मक अभ्यास करावा. पर्याय उपलब्ध असतील, तर केवळ प्रकल्पाचे काम सुरू झाले आहे म्हणून जंगलतोडीचे समर्थन करता येणार नाही.

तोडलेल्या झाडांच्या बदल्यात ९० हजार झाडे लावण्याचा कंपनीचा दावा आहे. मात्र, झाडांची संख्या वाढवण्याचे आश्वासन देणे आणि प्रत्यक्षात जंगल उभे करणे यात मोठा फरक आहे. नव्याने लावलेली झाडे जगतील का, त्यांची निगा राखली जाईल का आणि त्यातून मूळ जंगलातील जैवविविधता पुन्हा निर्माण होईल का, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. त्यामुळे पर्यायी वृक्षलागवड, नियमित देखभाल आणि झाडांच्या जगण्याचे प्रमाण यांची पारदर्शक तपासणी अनिवार्य करावी. आवश्यक अटींची पूर्तता झाल्याशिवाय प्रकल्पाच्या पुढील कामाला परवानगी देऊ नये.

लोकशाहीत बहुमत मिळणे म्हणजे जनतेच्या प्रत्येक प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार नव्हे. स्थानिकांना विश्वासात न घेता घेतलेले निर्णय आंदोलनांना जन्म देतात. करार, गुंतवणूक आणि विकासाच्या घोषणा करण्यापूर्वी जनसंवाद साधला असता, तर आजचा संघर्ष टाळता आला असता. पोलिसी बळाचा वापर करून विरोध दडपण्यापेक्षा शास्त्रीय माहिती, पारदर्शकता आणि चर्चेच्या माध्यमातून जनसमर्थन मिळवणे अधिक योग्य आहे. वीज हवीच; पण त्यासाठी जंगलाचा बळी देणे अपरिहार्य आहे का, याचे उत्तर सरकारने द्यायला हवे. विकासाचा खरा अर्थ निसर्ग उद्ध्वस्त करणे नव्हे, तर पर्यावरण आणि जनहित यांचा समतोल राखणे हा आहे.

## प्रासंगिक »

# शेवटची पैज

**एका गावात रघू नावाचा तरुण राहत होता. त्याला बुद्धिबळ खेळण्याची खूप आवड होती. गावातील स्पर्धेत तो सतत हरत असल्यामुळे लोक त्याची चेष्टा करत. तरीही त्याने खेळ सोडला नाही.**

एकदा गावात दूरच्या शहरातून एक अनुभवी खेळाडू आला. त्याने जाहीर केले की, जो त्याला हरवेल त्याला चांदीचे पदक मिळेल. अनेकांनी प्रयत्न केला, पण सर्वजण हरले.

रघूनेही स्पर्धेत भाग घेतला. खेळ सुरू झाल्यावर त्याने घाई न करता प्रतिस्पर्ध्याच्या प्रत्येक चालीकडे लक्ष दिले. त्याला एक महत्त्वाची गोष्ट जाणवली. प्रतिस्पर्धी नेहमी हत्ती वाचवण्यासाठी आपली चाल बदलत होता. रघूने याच सवयीचा फायदा घेतला आणि योग्य वेळी त्याच्या राजाला शह दिला.

रघू जिंकला तेव्हा संपूर्ण गाव आश्चर्यचकित झाले. त्याने पदक स्वीकारले आणि म्हणाला, “मी इतरांपेक्षा हुशार नव्हतो; मी फक्त खेळ समजून घेण्याचा प्रयत्न केला.”त्या दिवसापासून गावकऱ्यांनी त्याची चेष्टा करणे बंद केले.

- तात्पर्य : यश मिळवण्यासाठी केवळ कौशल्य पुरेसे नसते; निरीक्षण, संयम आणि योग्य निर्णयही महत्त्वाचे असतात.

महाराष्ट्रात सर्वाधिक पाऊस पडणाऱ्या कोकणात यंदा ४५ पैकी १२ तालुक्यांमध्ये दुष्काळस्थिती निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही दुष्काळाची तीव्रता जाणवत आहे.

# कोकण तहानलेला; पाटबंधारे प्रकल्प कागदावरच!



भातशेती, आंबा, कोकम, जांभूळ आणि चिकू यांसारख्या बागायती पिकांना पाण्याचा फटका बसत आहे. पावसाचे प्रमाण जास्त असूनही पाणीटंचाई निर्माण होत असेल, तर दोष केवळ निसर्गाचा नसून नियोजनातील त्रुटींचाही आहे. कोकणातील रखडलेले पाटबंधारे प्रकल्प आणि अपुरे जलसंधारण यामुळे पाण्याचे नियोजन करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

कोकणातील छोटे-मोठे १६३ पाटबंधारे प्रकल्प निधीअभावी अपूर्ण आहेत. त्यापैकी सिंधुदुर्गातील २५ प्रकल्प रखडले आहेत. हे प्रकल्प वेळेत पूर्ण झाले असते, तर पिण्याच्या पाण्यासोबत शेतीच्या सिंचनाचीही गरज भागवता आली असती. पावसाळ्यात हजारो लिटर पाणी समुद्राला जाऊन मिळते; मात्र ते अडवून साठवण्याची व्यवस्था अपुरी आहे. अनेक प्रकल्प २५ वर्षांपासून रखडल्याने त्यांचा खर्चही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. ही परिस्थिती सरकारच्या प्राधान्यक्रमांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

दुसरीकडे, महामुंबईची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी यामुळे जलस्रोतांवर ताण वाढत आहे. पाणीकपातीची वेळ येत असताना कोकणातील उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करण्याची गरज अधिक महत्त्वाची ठरते. नद्यांमधील गाळ काढणे, नैसर्गिक जलस्रोत पुनर्स्थापित करणे, पाणथळ जागांचे सर्वेक्षण करणे आणि वनराई बंधाऱ्यांसारखे उपाय प्रभावीपणे राबवणे आवश्यक आहे. स्थलांतरित पक्ष्यांच्या आगमनावरही बदलत्या पर्यावरणाचा परिणाम होत असल्याने जलस्रोतांचे संवर्धन केवळ शेतीपुरते मर्यादित राहू शकत नाही. सरकारे लोकप्रिय योजनांवर मोठा खर्च करतात; मात्र मूलभूत पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष होते. पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी, कालबद्ध कार्यक्रम आणि नियमित देखरेख आवश्यक आहे. जिल्हा नियोजन बैठकींमध्ये या प्रश्नाला सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. त्याचबरोबर कोकणातील पिकांच्या पद्धतीचा पुनर्विचार करून उपलब्ध पाण्यानुसार शेतीचे नियोजन करणे गरजेचे आहे.

कोकणाला पावसाची कमतरता नाही; कमतरता आहे ती पाणी अडवण्याच्या दूरदृष्टीची. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा पावसाळ्यातील पाणी साठवण्याची व्यवस्था उभी करणे अधिक महत्त्वाचे आहे. रखडलेले पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करणे ही केवळ विकासाची नव्हे, तर कोकणच्या शेतीच्या, अर्थव्यवस्थेच्या आणि भविष्यातील जलसुरक्षेची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



तिर्थी धोंडा पाणी ।
देव रोकडा सज्जनीं ॥१॥

मिळालिया संतसंग ।
समर्पितां भलें अंग ॥धृ.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# विद्यापीठांतील प्रशासकीय कामकाज ठप्प होणार?

## ५ नोव्हेंबरपासून आंदोलन; शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आंदोलन तीव्र होणार!

**महाईन्यूज । अमरावती**

**राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आता राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीच्या वतीने ५ नोव्हेंबर २०२६ रोजी पुण्यातील उच्च शिक्षण संचालनालयावर मोर्चा काढून एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. समितीचे अध्यक्ष अजय देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार असून, शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास बेमुदत संप पुकारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.**




शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनाकडून वारंवार आश्वासने देण्यात आली. यापूर्वी शासनाच्या विनंतीचा मान राखून आणि विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले होते. मात्र, आचारसंहिता संपल्यानंतर उच्च शिक्षण संचालनालयात सकारात्मक चर्चा होऊनही कोणताही ठोस शासन निर्णय झालेला नाही. त्यामुळे राज्यातील हजारो शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली असून, आंदोलनाशिवाय पर्याय उरला नसल्याची भूमिका संयुक्त कृती समितीने घेतली आहे.

सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० आणि ३० वर्षांच्या सेवेनंतर सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करावी, २००५ पूर्वी भरती प्रक्रिया सुरू झालेल्या पात्र कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, तसेच विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील रिक्त शिक्षकेतर पदांच्या भरतीला तातडीने मंजुरी द्यावी, या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय पाच दिवसांचा आठवडा लागू करणे, प्रयोगशाळा परिचरांना कालबद्ध पदोन्नतीत सुधारित वेतनश्रेणी देणे आणि गोंडवाना विद्यापीठासाठी स्वतंत्र सहसंचालक कार्यालय स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

या मागण्यांसाठी ५ नोव्हेंबर रोजी पुण्यातील शिवाजीनगर येथील उच्च शिक्षण संचालनालयासमोर मोर्चा आणि धरणे आंदोलन करण्यात येईल. त्यानंतरही शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास १३ नोव्हेंबर रोजी राज्यभर एकदिवसीय 'लेखणी बंद' आंदोलन, तर १८ नोव्हेंबर रोजी अत्यावश्यक सेवा वगळून राज्यव्यापी लाक्षणिक कामबंद आंदोलन करण्यात येणार आहे.

त्यानंतरही शासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचारी बेमुदत संपावर जातील, असा इशारा संयुक्त कृती समितीने दिला आहे. त्यामुळे आगामी काळात राज्यातील उच्च शिक्षण संस्थांच्या प्रशासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### ...त्यानंतर बेमुदत संपाचा इशारा

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी संयुक्त कृती समितीने टप्प्याटप्प्याने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात ५ नोव्हेंबर रोजी पुण्यातील उच्च शिक्षण संचालनालयावर मोर्चा आणि एकदिवसीय धरणे आंदोलन होणार आहे. त्यानंतर १३ नोव्हेंबर रोजी राज्यभर 'लेखणी बंद' आंदोलन, तर १८ नोव्हेंबर रोजी अत्यावश्यक सेवा वगळून एकदिवसीय लाक्षणिक कामबंद आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनानंतरही शासनाकडून ठोस निर्णय न झाल्यास राज्यभर बेमुदत संप पुकारण्यात येणार असल्याचा इशारा संयुक्त कृती समितीने दिला आहे.

# दुष्काळात शेतकऱ्यांची पिळवणूक कराल तर खबरदार; शिंदेंचा रुद्रावतार!

**महाईन्यूज । मुंबई**

**दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकडून सक्तीने कर्जवसुली करणाऱ्या बँका, मायक्रो फायनान्स कंपन्या, वित्तीय संस्था आणि सावकारांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कडक इशारा दिला आहे. कर्जवसुलीच्या नावाखाली शेतकऱ्यांचा मानसिक छळ करणाऱ्या किंवा त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यांची कोणत्याही परिस्थितीत गय केली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. 'मायक्रो फायनान्स असो, फायनान्स कंपनी असो, बँक असो किंवा सावकारी कर्ज असो; शेतकऱ्याला नडणाऱ्याला बिलकुल सोडणार नाही,' अशा शब्दांत शिंदे यांनी संबंधितांना सुनावले.**



राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. अशा परिस्थितीत कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांवर दबाव आणणे, वारंवार तगादा लावणे किंवा त्यांना कार्यालयात बोलावून त्रास देणे यांसारख्या प्रकारांची गंभीर दखल घेतली जाणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले. नांदेडमधील सक्तीच्या कर्जवसुलीच्या घटनेचा संदर्भ देत अशा प्रकारांमध्ये सहभागी असलेल्यांवर कठोर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही त्यांनी दिला.

शेतकऱ्यांची पिळवणूक रोखण्यासाठी रिझर्व्ह बँक, बँका आणि संबंधित वित्तीय संस्थांशी चर्चा करण्यात आली असून, आवश्यक सूचना देण्यात आल्याचे शिंदे यांनी सांगितले. कर्जवसुलीच्या नावाखाली कोणी धमकावत असेल किंवा दबाव आणत असेल, तर शेतकऱ्यांनी घाबरून न जाता तातडीने संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

दरम्यान, राज्यातील सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांना दुष्काळी उपाययोजनांचा लाभ मिळणार असल्याचा दावा शिंदे यांनी केला. दिवाळीपूर्वी जाहीर करण्यात आलेली पाच हजार रुपयांची मदत ही तातडीच्या स्वरूपाची असून, त्याव्यतिरिक्त शासनाच्या विविध सवलती आणि योजनांचाही लाभ शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एकही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, असे आश्वासन त्यांनी दिले.

दुष्काळग्रस्त भागांमध्ये पिण्याचे पाणी, टँकर आणि जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. तसेच धरणांच्या परिसरातील गाळपेऱ्याच्या जमिनीवर चारा लागवडीला प्रोत्साहन देऊन त्यासाठी हमीभाव आणि आर्थिक लाभ उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

दरम्यान, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यावरूनही शिंदे यांनी काँग्रेसवर टीका केली. देशाच्या पंतप्रधानांवर खालच्या पातळीवर टीका करणे निंदनीय असल्याचे सांगत मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा विकास होत असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच भारतात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत, असेही त्यांनी म्हटले.

### सक्तीच्या कर्जवसुलीला बळी पडू नका; सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी!

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी त्रास देणाऱ्या बँका, मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खासगी सावकारांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. कर्जवसुलीसाठी धमक्या देणे, मानसिक दबाव आणणे किंवा शेतकऱ्यांचा छळ करणे खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारांना सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांनी घाबरून न जाता तातडीने संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही शिंदे यांनी दिली आहे.

# ट्रम्प यांच्यावर बलात्काराचा आरोप!

## १९९३ मधील कथित बलात्काराचा आरोप; व्हाईट हाऊसने आरोप फेटाळले

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि लैंगिक गुन्ह्यांत दोषी ठरलेला दिवंगत जेफ्री एपस्टीन यांच्यातील कथित संबंधांवरून अमेरिकन राजकारणात पुन्हा खळबळ उडाली आहे. अमेरिकेच्या संसदेतील 'हाउस ज्युडिशिअरी कमिटी'च्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या सदस्यांनी सोमवारी प्रसिद्ध केलेल्या ५३ पानांच्या अहवालात ट्रम्प यांच्यावर १९९३ मधील एका बलात्काराचा पुन्हा एकदा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय अमेरिकेच्या न्याय विभागाने या प्रकरणातील महत्त्वाचे पुरावे दडपल्याचा ठपका ठेवत, एपस्टीनच्या सहकाऱ्यांची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी डेमोक्रॅट्सनी केली आहे.**



डेमोक्रॅटिक पक्षाने प्रसिद्ध केलेल्या या अहवालात एकूण ११ महिलांशी संबंधित गंभीर आरोपांचा तपशील देण्यात आला आहे. त्यापैकी पाच महिलांनी एपस्टीनच्या उपस्थितीत किंवा त्याच्याशी संबंधित पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी बलात्कार अथवा लैंगिक अत्याचार केल्याचा थेट आरोप केला आहे.

नव्या माहितीनुसार, माजी मिस स्वित्झर्लंड आणि मॉडेल बीट्रिस केउल यांनी संसदेच्या कर्मचाऱ्यांना दिलेल्या जबाबात ट्रम्प यांच्यावर बलात्काराचा आरोप केला आहे. नोव्हेंबर १९९३ मध्ये, केउल २४ वर्षांच्या असताना न्यूयॉर्कमधील 'प्लाझा हॉटेल'च्या एका सुइटमध्ये ट्रम्प यांनी आपल्यावर बलात्कार केल्याचा दावा त्यांनी केला.

टाइमने दिलेल्या वृत्तानुसार, अमेरिकन ड्रीम पेजंट या सौंदर्य स्पर्धेदरम्यान एका पत्रकार परिषदेत ट्रम्प यांच्याशी आपली भेट झाली होती, असे केउल यांनी सांगितले. त्यावेळी ट्रम्प यांनी अमेरिकेचा व्हिसा मिळवून देण्यासाठी आणि त्यांचे सहकारी पाओलो झाम्पोली यांच्यामार्फत न्यूयॉर्क विद्यापीठात प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवले होते. याच कार्यक्रमात केउल यांची एपस्टीनशीही भेट झाली होती; त्याने ट्रम्प यांच्याबरोबर अशा अनेक पार्ट्या आयोजित केल्याचे सांगितले होते.

केउल यांच्या आरोपानुसार, त्यानंतर ट्रम्प यांनी त्यांना हॉटेलच्या सुइटमध्ये बोलावले आणि तिथे त्यांच्यावर बळजबरी केली. या झटापटीत त्या रक्तबंबाळ झाल्या आणि त्यांच्या अंगावर जखमा झाल्या होत्या. त्यानंतर ट्रम्प यांनी तोंड बंद ठेवण्याची धमकी दिली तसेच व्हिसा आणि विद्यापीठ प्रवेशाबाबत पुन्हा आश्वासन दिले, असे केउल यांनी म्हटले आहे. अमेरिकेत आल्यावर आपला पासपोर्ट काढून घेण्यात आला होता, त्यामुळे स्पर्धा सोडून तत्काळ मायदेशी परतणे शक्य झाले नाही, असा आरोपही त्यांनी केला.

### व्हाईट हाऊसकडून सर्व आरोप फेटाळले

व्हाईट हाऊसने हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या लॉरेन बिस यांनी स्पष्ट केले की, "एपस्टीन प्रकरणाशी संबंधित सर्व आरोपांतून डोनाल्ड ट्रम्प यांना यापूर्वीच पूर्णपणे निर्दोष ठरवण्यात आले आहे." प्रशासनाच्या कामावरून लक्ष विचलित करण्यासाठी डेमोक्रॅटिक पक्षाने रचलेला हा राजकीय डाव असल्याचा आरोप त्यांनी केला. ट्रम्प यांनीही एपस्टीनशी संबंधित गैरव्यवहारांचे आरोप सातत्याने फेटाळले आहेत.

# तमिळनाडूत एक हजारांवरील मद्य खरेदीसाठी डिजिटल पेमेंट अनिवार्य!

**महाईन्यूज । तामिळनाडू**

**गेल्या काही महिन्यांपासून मुख्यमंत्री विजय यांनी आतापर्यंत अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. त्यामुळे त्यांच्या कामाची सध्या मोठी चर्चा सुरू आहे. यातच आता तमिळनाडू सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. तमिळनाडूमध्ये १ हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या मद्य खरेदीसाठी आता डिजिटल पेमेंट अनिवार्य करण्यात आलं आहे.**



तमिळनाडू स्टेट मार्केटिंग कॉर्पोरेशनने (TASMAC) हा निर्णय घेतला असून १ नोव्हेंबरपासून १ हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या मद्य खरेदीसाठी डिजिटल पेमेंट अनिवार्य असणार आहे.

१ हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या मद्य खरेदीसाठी डिजिटल पेमेंट अनिवार्य करण्यामागचा उद्देश हा व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणण आणि मोठ्या प्रमाणात रोख रक्कम हाताळताना येणाऱ्या अडचणी कमी करणं हा आहे. १ हजार रुपयांपर्यंतच्या मद्य खरेदीसाठी ग्राहक पूर्वीप्रमाणेच रोख रकमेद्वारे किंवा डिजिटल माध्यमातून पैसे भरू शकणार आहेत.

"दररोज मोठ्या प्रमाणात रोख रक्कम हाताळल्यामुळे दुकानातील कर्मचाऱ्यांना अनेक व्यावहारिक अडचणींचा सामना करावा लागतो. यामध्ये रोख रक्कम एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना असणारी सुरक्षा, हिशोबात तफावत निर्माण होणं आणि बनावट नोटांचा धोका, यासह आदी अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे आता हा निर्णय घेण्यात आला आहे", अशी माहिती अधिकाऱ्यांनी सांगितली.



"ग्राहकांकडून एमआरपीपेक्षा जास्त पैसे आकारले जात असल्याच्या तक्रारी सरकारकडे येत होत्या. डिजिटल पेमेंटमुळे प्रत्येक व्यवहाराची नोंद अचूक वेळ आणि रकमेसह रिअल-टाइममध्ये होईल. त्यामुळे जास्तीचे पैसे आकारण्यावर प्रतिबंध बसेल आणि विक्रीतून मिळालेली रक्कम थेट अधिकृत बँक खात्यात जमा होईल. डिजिटल पेमेंटची ही अट टप्प्याटप्प्याने लागू केली जाईल. १ नोव्हेंबरपासून १ हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कोणत्याही खरेदीसाठी ग्राहकांना यूपीआय, डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्डद्वारे पैसे भरावे लागतील", असं अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं.

### ..तर कठोर कारवाई होणार?

दरम्यान, या मर्यादित रकमेच्या आत खरेदी करणाऱ्या ग्राहकांना रोख रकमेद्वारे किंवा डिजिटल माध्यमांतून पैसे भरण्याचा पर्याय उपलब्ध असेल. या नियमाचं उल्लंघन केल्यास संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध कठोर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. या निर्णयाबाबत सर्व दुकानांमध्ये ठळक सूचना फलक लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्याने सांगितल्याचं वृत्तात म्हटलं आहे.



# निर्माते बी.पी. सिंह यांचं निधन

छोट्या पडद्यावर गुन्ह्यांचा थरार उभा करणारे, रहस्याच्या प्रत्येक वळणावर प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे आणि 'सीआयडी'सारखी अजरामर मालिका घराघरांत पोहोचवणारे ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक बी. पी. सिंह यांचं निधन झालं आहे. २७ ऑक्टोबर रोजी वयाच्या ७७ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने भारतीय टेलिव्हिजन विश्वाला मोठा धक्का बसला असून, अनेक वर्षं त्यांच्या कलाकृतींवर प्रेम करणाऱ्या प्रेक्षकांमध्येही हळहळ व्यक्त होत आहे. २८ ऑक्टोबर रोजी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. बी. पी. सिंह म्हणजेच 'ब्रिजेंद्र पाल सिंह' यांनी भारतीय टेलिव्हिजनवर गुन्हेगारी आणि रहस्यप्रधान मालिकांची स्वतंत्र ओळख निर्माण केली. 'सीआयडी' आणि 'आहट' या लोकप्रिय मालिकांच्या माध्यमातून त्यांनी प्रेक्षकांना थरारक कथांचा वेगळाच अनुभव दिला. बी. पी. सिंह यांच्या कारकिर्दीतील सर्वाधिक गाजलेली कलाकृती म्हणजे 'सीआयडी'. १९९८ मध्ये सोनी टीव्हीवर सुरू झालेल्या या मालिकेने गुन्हेगारी तपास, रहस्य, संशय आणि अनपेक्षित वळणं यांची सांगड घालत प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवलं. २०१८ पर्यंत जवळपास दोन दशकं ही मालिका प्रेक्षकांचं मनोरंजन करत राहिली. एसीपी प्रद्युम्न, इन्स्पेक्टर दया आणि इन्स्पेक्टर अभिजीत यांसारख्या व्यक्तिरेखांनी प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केलं. मालिकेतील तपासाची पद्धत, गुन्हेगारांचा शोध आणि लक्षात राहणारे संवाद यामुळे 'सीआयडी' लोकप्रिय संस्कृतीचा एक भाग बनली. बी. पी. सिंह यांनी 'सीआयडी'च्या निर्मिती आणि दिग्दर्शनासोबतच या मालिकेत अभिनयही केला होता.



# वामिकाचं अभिनयातून चोख उत्तर!

अनेक नकार आणि अपयशांचा सामना करूनही जिद्द न सोडता यश मिळवता येते, हे अभिनेत्री वामिका गब्बीने सिद्ध केले आहे. 'तुला कोणीही नायिका म्हणून घेणार नाही,' असे कटू शब्द ऐकणाऱ्या वामिकाने आज आपल्या अभिनयाच्या जोरावर मनोरंजनविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. २९ सप्टेंबर १९९३ रोजी चंदीगड येथे जन्मलेल्या वामिकाने २००७ मध्ये 'जब वी मेट' या चित्रपटातून बालकलाकार म्हणून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर 'लव आज कल', 'मौसम' आणि 'बिट्टू बॉस' यांसारख्या चित्रपटांत ती दिसली. मात्र, सुरुवातीला तिला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी तिला मोठा संघर्ष करावा लागला. वामिकाने पंजाबी, तमिळ, तेलुगू आणि मल्याळम चित्रपटांमध्येही काम केले. मात्र, अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतरही अपेक्षित संधी मिळत नसल्याने २०१९ मध्ये तिने अभिनय सोडण्याचाही विचार केला होता. काही महत्त्वाकांक्षी वेब प्रकल्प प्रदर्शित न झाल्याने तिची निराशा आणखी वाढली. अशा परिस्थितीत तिने अभिनय कौशल्य सुधारण्यावर भर दिला. २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या विक्रमादित्य मोटवानी यांच्या 'जुबली' या वेब सीरिजने तिच्या कारकिर्दीला मोठी कलाटणी दिली. यामध्ये तिने साकारलेल्या 'नीलोफर कुरेशी' या भूमिकेचे प्रेक्षक आणि समीक्षकांनी कौतुक केले. सततचे नकार, संघर्ष आणि अपयशावर मात करत वामिकाने मनोरंजनविश्वात स्वतःची ओळख निर्माण केली. तिचा प्रवास नवोदित कलाकारांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



# आर. बाल्कींच्या चित्रपटात विद्या बालन

विद्या बालन आणि आर. बाल्की यांनी यापूर्वी 2009 मध्ये प्रदर्शित चित्रपट 'पा'मध्ये एकत्र काम केले होते. या चित्रपटात अमिताभ बच्चन मुख्य भूमिकेत होते. आता सुमारे 17 वर्षांनी विद्या आणि बाल्की यांची जोडी पुन्हा एकत्र आली आहे. विद्याने सोशल मीडियावर नव्या चित्रपटाची एक झलक शेअर केली आहे. या छायाचित्रात ती हातात स्क्रिप्ट घेऊन असल्याचे दिसून येते. स्वत:चा नवा लुक शेअर करत विद्याने 'नवी सुरुवात, आर. बाल्की यांच्यासोबत नवा तमिळ चित्रपट' अशी कॅप्शन दिली आहे. सध्या चित्रपटाची कहाणी किंवा विद्याच्या भूमिकेविषयी अधिक माहिती समोर आलेली नाही. निर्मात्यांनी देखील याबद्दल गुप्तता बाळगली आहे. विद्याच्या सोशल मीडिया पोस्टमधून चित्रपटावर काम सुरू झाल्याचे कळते. विद्या बालनकडे सध्या अनेक मोठे प्रोजेक्ट्स आहेत. तिचा जेलर 2 हा चित्रपट अलिकडेच प्रदर्शित झाला असून त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. याचबरोबर विद्या ही अक्षय कुमारसोबत एका विनोदी चित्रपटात दिसून येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनीस बझ्मी करत आहेत. हा चित्रपट 4 डिसेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.

# भारताचा न्यूझीलंडवर दणदणीत विजय!

## १३ षटकांत गाठलं लक्ष्य; अभिषेक-वैभवचं वादळ; टीम इंडियाने जिंकली मालिका

**महाईन्यूज । वेलिंगटन**

**भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना वेलिंगटनमध्ये पार पडला. या सामन्यात भारतीय फलंदाजांकडून तुफान फटकेबाजी पाहायला मिळाली. भारतीय संघाला विजय मिळवण्यासाठी १९९ धावा करायच्या होत्या. हे आव्हान भारतीय संघाने अवघ्या १३.२ षटकांत पूर्ण केलं आणि ६ गडी राखून विजय मिळवला. यासह भारतीय संघाने ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेत ३-० ने विजयी आघाडी घेतली आहे. धावांचा पाठलाग करताना वैभव सूर्यवंशीचं अर्धशतक थोडक्यात हुकलं. तर अभिषेक शर्माने ११३ धावांची वादळी शतकी खेळी केली.**




भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी १९९ धावांचा डोंगर सर करायचा होता. या सामन्यात वैभव सूर्यवंशी आणि अभिषेक शर्माची जोडी डावाची सुरूवात करण्यासाठी मैदानात आली. गेल्या सामन्यात वैभव तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला होता. या सामन्यात तो स्वस्तात माघारी परतला होता. पण आपल्या नेहमीच्या स्थानी परतल्यानंतर त्याने पहिल्या चेंडूपासून गोलंदाजांवर हल्ला चढवला. त्याने चौकार मारून आपल्या डावाची सुरुवात केली. तर दुसरीकडे अभिषेक शर्माने षटकार खेचून खातं उघडलं. दोघांनी तिसऱ्या षटकातच संघाची धावसंख्या ५० पार पोहोचवली होती.

तर पाचव्या षटकात भारतीय संघाने १०० धावांचा पल्ला गाठला.यादरम्यान वैभव सूर्यवंशीने १९ चेंडूंमध्ये ४ चौकार आणि ४ षटकारांच्या साहाय्याने ४५ धावांची खेळी केली. तर अभिषेक शर्माने ३५ चेंडूंमध्ये आपलं शतक पूर्ण केलं. त्याने या डावात फलंदाजी करताना ३८ चेंडूंमध्ये ११३ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने ९ चौकार आणि ११ षटकार खेचले. वैभव आणि अभिषेकने पहिल्या विकेटसाठी १३३ धावांची भागीदारी करून भारतीय संघाच्या विजयाचा पाया रचला.

### न्यूझीलंडने केल्या १९८ धावा

या सामन्यात न्यूझीलंडचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. डावाच्या सुरूवातीलाच न्यूझीलंडला मोठा धक्का बसला. टीम सायफर्ट अवघ्या २ धावा करून माघारी परतला. त्यानंतर फिन ॲलेनने ४० धावांची खेळी केली. ग्लेन फिलिप्सने १७ धावा केल्या. तर डॅरिल मिचेल आणि बेवॉन जेकब्सची जोडी शेवटपर्यंत टिकून राहिली. डॅरिल मिचेलने नाबाद ८९ धावांची खेळी केली. तर जेकब्स ३९ धाावांवर नाबाद राहिला. यासह न्यूझीलंडने २० षटकांअखेर ३ गडी बाद १९८ धावा केल्या.

# भारत अ संघाला विजयासाठी एका विकेटची गरज अन् सामना पंचांनी केला ड्रॉ!

**महाईन्यूज । न्यूजीलैंड**

**भारत अ संघाने खराब सुरूवातीनंतर न्यूझीलंड अ संघाविरूद्ध कडवी झुंज दिली आणि सामना जिंकण्याच्या उंबरठ्यावर संघ होता. भारताला सामना जिंकण्यासाठी एका विकेटची गरज असतानाच हा अनऑफिशियल कसोटी सामना बरोबरीत सुटल्याचं जाहीर करण्यात आलं. खराब प्रकाशामुळे सामना थांबण्यात आला आणि त्यानंतर तासभर वाट पाहिल्यानंतर पंचांनी परिस्थिती न सुधारल्याने सामना ड्रॉ झाल्याचं घोषित केलं.**




भारत अ आणि न्यूझीलंड अ संघांच्या सामन्याची नाणेफेक यजमान संघाने जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाची सुरूवात खूप खराब झाली होती. भारतीय संघ पहिल्या डावात अवघ्या ११३ धावांवर सर्वबाद झाला. या डावात भारताचे ५ फलंदाज शून्यावर बाद झाले. तर देवदत्त पडिक्कलने ३२ धावा, यश राठोडने ४४ धावांचं योगदान दिलं होतं. न्यूझीलंड अ संघाकडून सिमॉन किनी याने ५ विकेट्स, झॅक गिब्सन ३ विकेट्स व क्रिस्टन क्लार्क व फ्रेझर शीट यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.

प्रत्युत्तरात न्यूझीलंड अ संघाने दुसऱ्या डावात ३१७ धावांचा डोंगर उभारला. यासह न्यूझीलंड अ संघाने २०४ धावांची आघाडी मिळवली. कर्णधार रिस मारियूने ७६ धावा, कर्टिस हीफीने ४४ धावा, डिएन फॉक्सक्रॉफ्टने ५१ धावा व क्रिस्टियन क्लार्कने ४२ धावांचं योगदान दिलं. भारताकडून पहिल्या डावात अंशुल कंबोज व आकिब नाबी यांनी प्रत्येका ३-३ विकेट्स घेतल्या. तर आकाशदीपने २ व मुकेश चौधरी व वॉशिंग्टने १-१ विकेट घेतल्या.

दुसऱ्या डावापूर्वी भारतीय संघ २०४ धावांनी मागे होता. भारताची सुरूवात पुन्हा एकदा खराब झाली. यशस्वी ५ धावा तर केएल राहुल ४ धावांवर बाद होत माघारी परतले. त्यानंतर देवदत्त पडिक्कल व साई सुदर्शन यांनी भारताचा डाव सावरला. दोघांनी २१५ धावांची भागीदारी रचली. ज्यात देवदत्त पडिक्कल १९९ धावांवर बाद झाल्याने त्याचं द्विशतक हुकलं. त्याने २४ चौकार व ३ षटकारांसह १९९ धावा केल्या. तर साई सुदर्शन ९१ धावांची खेळी केली. यानंतर खालच्या फळीत यश राठोडने ६६ धावा व वॉशिंग्टन सुंदरने ५२ धावांचं योगदान दिलं. यानंतर अंशुल कंबोजने २३ धावा, आकिब नहीने ३८ धावा व आकाशदीपने २५ धावा केल्या. यासह भारताने दुसऱ्या डावात ५१६ धावांचा डोंगर उभारला. यासह संघाने ३१२ धावांची मोठी आघाडी घेतली.

प्रत्युत्तरात आकिब नबीने सुरूवातीच्या षटकांमध्येच ३ विकेट्स घेत यजमान संघाला मोठा धक्का दिला. न्यूझीलंड अ संघाकडून कर्टिस हीफीने शतकी खेळी साकारली. तर डिन फॉक्सक्रॉफ्टने ४२ धावा केल्या. याशिवाय इतर सर्व फलंदाज २० धावांचा टप्पाही गाठू शकले नाहीत. भारताकडून या सामन्यात आकिब नबीने ३ विकेट्स घेतल्या. देवदत्त पडिक्कलने २ विकेट्स व अंशुल कंबोज, आकाशदीप, मुकेश चौधरी व वॉशिंग्टन सुंदर यांनी १-१ विकेट्स घेतल्या.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। बुधवार ।
दि. 28 ऑक्टोबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# दुष्काळग्रस्तांसाठी आमदार शंकर जगताप यांचा मदतीचा हात..!

## मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे ११ लाखांची मदत सुपूर्द; संकटातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पावसाने अचानक दडी मारल्याने निर्माण झालेली दुष्काळ परिस्थिती, शेतीचे नुकसान आणि आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी चंद्रंग डेव्हलपर्स अँड बिल्डर्सच्या वतीने विजुशेठ जगताप आणि चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि संकटाच्या काळात त्यांना आधार मिळावा, या उद्देशाने जगताप यांच्यावतीने मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे ११ लाख रुपयांची मदत सुपूर्द करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या मदतीचा धनादेश देण्यात आला.**



शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसाठी दुष्काळ हा केवळ पाण्याचा प्रश्न राहत नाही, तर तो त्यांच्या उदरनिर्वाहाचाही प्रश्न बनतो. पिकांची हानी, घटते उत्पन्न आणि वाढत्या आर्थिक अडचणींमुळे शेतकरी कुटुंबांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना मदतीचा हात देण्याची गरज असते. याच सामाजिक जाणिवेतून आमदार जगताप यांनी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ११ लाख रुपयांचे योगदान दिले. शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकरी सक्षम असेल, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळ मिळते. त्यामुळे संकटाच्या काळात शेतकऱ्यांना केवळ सहानुभूती न दाखवता प्रत्यक्ष मदत मिळणे महत्त्वाचे आहे. दुष्काळग्रस्तांना मदत पोहोचविण्याच्या प्रयत्नांना हातभार लागावा, या हेतूने ही रक्कम देण्यात आली आहे. यावेळी ॲड. सखाराम कोळसे पाटील, निलेश पवार, प्रवीण जगताप आदी यावेळी उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप यांनी पिंपरी चिंचवड शहरातील अनेक होतकरू कुटुंबियांना शैक्षणिक, आरोग्य विषयक कारणांसाठी आर्थिक मदत केली आहे. त्यांच्या माध्यमातून नेहमीच नागरिकांसाठी मदतकार्य सुरू असते. मात्र, यंदा संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळाच्या झळा सोसत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आमदार जगताप यांच्याकडून दुष्काळग्रस्तांसाठी निरंतन काम सुरू राहणार आहे.

> “ शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र, दुष्काळासारख्या संकटामुळे शेतकरी बांधवांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना आपण एकटे नाही, तर संपूर्ण समाज त्यांच्या पाठीशी उभा आहे, याची जाणीव होणे आवश्यक आहे. याच भावनेतून मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे ११ लाख रुपयांची मदत सुपूर्द केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार समाजातील प्रत्येक घटकाला मदत करण्यासाठी कटिबद्ध आहे.
>
> **- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा**



# भोसरीत २० फूट उंचीवरून पडून १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

भोसरीतील चक्रपाणी वसाहत येथे फॅब्रिकेशनचे काम करताना २० फूट उंचीवरून खाली पडल्याने १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवा कश्यप (वय १९) हा २६ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास इंडियन ऑइल पेट्रोल पंपाशेजारील मोकळ्या जागेतील शेडमध्ये फॅब्रिकेशनचे काम करत होता. यावेळी पाय घसरल्याने तो सुमारे २० फूट उंचीवरून खाली पडला. या दुर्घटनेत त्याच्या कानातून रक्त येऊ लागल्याने त्याला उपचारासाठी साईनाथ रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

या प्रकरणात ठेकेदाराने कामगाराला सेफ्टी बेल्ट, हेल्मेट, दोरी आदी आवश्यक सुरक्षा साधने पुरवली नसल्याने त्याच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

याप्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०६(१) अंतर्गत ८३१/२०२६ क्रमांकाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# गुन्हेगाराला पकडण्यासाठी धावताना हृदयविकाराचा धक्का; पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी परिसरात अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या दोन गुन्हेगारांना पकडण्यासाठी अमली पदार्थ विरोधी पथकाने रविवारी (२५ ऑक्टोबर) रात्री उशिरा सापळा लावला. एका गुन्हेगाराला पकडल्यानंतर पळून जाणाऱ्या दुसऱ्या गुन्हेगाराला पाठलाग करून पकडत असताना गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचाऱ्याला हृदयविकाराचा धक्का बसला. त्यात त्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. यामुळे पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलावर शोककळा पसरली आहे. जावेद बागसिराज असे मृत्यू झालेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे.**




जावेद बागसिराज यांचे कुटुंब मूळचे कर्नाटक राज्यातील आहे. त्यांचे वडील पुणे शहरात आले होते. त्यांचा जन्म पुणे शहरात झाला. ते २०१० मध्ये पुणे शहर पोलीस दलात भरती झाले होते. सुरुवातीला आठ वर्ष पुणे पोलीस दलातील हडपसर, मुंढवा पोलीस ठाण्यांत सेवा केली. २०१८ मध्ये पिंपरी-चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय सुरु झाल्यानंतर ते पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात आले. इथे त्यांनी सुरुवातीला पिंपरी आणि त्यानंतर गुन्हे शाखेत काम केले. सध्या ते गुन्हे शाखेच्या अँटी नार्कोटिक्स सेल मध्ये कार्यरत होते.

रविवारी रात्री उशिरा जावेद यांना एक टीप मिळाली. संशयित दोघेजण संत तुकाराम नगर येथे एमडी ड्रग्ज विक्रीसाठी येणार आहेत. त्यानुसार त्यांनी वरिष्ठांना याबाबत माहिती देऊन संत तुकाराम नगर मधील आंतरिक सोसायटी जवळ सापळा लावला. एमडी विक्रीसाठी आलेल्या एकाला त्यांनी पकडले. दरम्यान, पकडलेल्या संशयित आरोपीचा दुसरा साथीदार पळून जाऊ लागला. त्याला पकडण्यासाठी जावेद हे त्याच्या मागे धावले. धावत असताना अचानक त्यांच्या छातीत तीव्र कळ आली आणि ते खाली कोसळले.

जावेद यांच्या सहकाऱ्यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांना तात्काळ पिंपरी मधील वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच वेळी त्यांना आणखी एक हृदयविकाराचा धक्का बसला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. जावेद यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, १२ वर्षांची एक मुलगी आणि ७ वर्षांचा एक मुलगा असा परिवार आहे. जावेद यांचा दफनविधी कसबा येथील कब्रिस्तान येथे सोमवारी दुपारी झाला. जावेद हे अतिशय कष्टाळू होते. त्यांचे काम वाखणण्याजोगे असल्याच्या भावना वरिष्ठ अधिकारी व्यक्त करत आहेत.

# संस्थापकांचा समृद्ध वारसा आणि कर्मचाऱ्यांचे समर्पण

## आय आय बी एम समूह संचलित शाळा-महाविद्यालयांचा 'फाउंडर्स डे' उत्साहात संपन्न




**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**वर्णेकर युनिव्हर्सल फाउंडेशन, आयआयबीएम कॉलेज (IIBM), कॅम्ब्रिज स्कूल, चॅम्प्स स्कूल आणि जेट इंडिया या शिक्षण संस्थांच्या स्थापनदिनानिमित्त 'फाउंडर्स डे २०२६' गुरुवारी (दि. २२ ऑक्टोबर २०२६) अत्यंत उत्साहात व भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.**

संस्थेच्या प्रगतीमध्ये अविरत योगदान देणाऱ्या व दीर्घकाळ सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा या प्रसंगी विशेष 'लॉयल्टी अवॉर्ड' (Loyalty Awards) देऊन गौरव करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर आणि नगरसेविका सौ. शीतल वर्णेकर, अभिषेक वर्णेकर, यश वर्णेकर, संचालक राम रैना यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. तसेच विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर करण्यात आले. याप्रसंगी बोलताना अध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर यांनी संस्थेच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. "कुठल्याही शिक्षण संस्थेचा कणा हे तिचे निष्ठावंत शिक्षक आणि कर्मचारी असतात. आज संस्था ज्या उंचीवर पोहोचली आहे, त्यात या सर्वांचा मोलाचा वाटा आहे," असे उद्गार त्यांनी काढले.

'आय आय बी एम कॉलेज चिखली संस्थेतील लॉयल्टी अवॉर्ड' विजेते: संस्थेशी एकनिष्ठ राहून उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल श्री. अमोल भागवत, श्री. राजेश पेडणेकर, श्री. पांडुरंग मंचरे, कु. प्रतिक्षा डफळ, श्री. अनिकेत वंजारी, सौ. एकता सिंग, सौ. अनिता जवंजळ, श्री. सचिन बरबडे आणि श्री. मिलिंद उशिर या कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

तसेच संपूर्ण संस्थेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनाही पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला वर्णेकर युनिव्हर्सल फाउंडेशन मधील सर्व संस्थेचे महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख (HOD), शिक्षकवृंद आणि प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेलिब्रिटी अँकर ओंकारेश्वरी व आभारप्रदर्शन करून सोहळ्याची सांगता झाली.

## जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत राजमाता जिजाऊ कॉलेजचे यश

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**



श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणी नगर येथे झालेल्या शालेय जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स (मैदानी) स्पर्धेत राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय लांडेवाडी भोसरी येथील विद्यार्थी खेळाडूंनी ॲथलेटिक्स स्पर्धेतील विविध क्रीडा प्रकारात यश संपादन केलेले आहे. त्यातील प्रथम क्रमांक प्राप्त 07 खेळाडूंची दि. 30 व 31 ऑक्टोबर 2026 या कालावधीत संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल इंद्रायणी नगर, भोसरी पुणे येथे होणाऱ्या शालेय विभागस्तरीय ॲथलेटिक्स क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

४×१०० मीटर रिले प्रकारात १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने (ओंकार ढवळे, आयुष्य गुप्ता, ओंकार गुरूनावर, आरुष कुमार आणि दर्शित पाटील) प्रथम क्रमांक पटकावला, तर सार्थक गोंडे याने ५००० मीटर चालणे व लांब उडी या दोन्ही प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवत दुहेरी यश संपादन केले; तसेच ४०० मीटर हर्डल्स प्रकारात गौरव रोडे याने प्रथम क्रमांक पटकावला.

सदर खेळाडूंना कनिष्ठ महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा.गोपीचंद करंडे यांनी विशेष मार्गदर्शन केले.

या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरी चे प्रथम आमदार मा.श्री. विलासराव लांडे साहेब यांनी विशेष अभिनंदन करून खेळाडूंना विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार व पिं.चि.मनपा.स्थायी समितीचे मा.अध्यक्ष श्री अजितभाऊ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री सुधीर मुंगसे सर, पिं.चिं. मनपाचे नगरसेवक व संस्थेचे विश्वस्त विक्रांतदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कानडे के.जी , उपप्राचार्य प्रा.किरण चौधरी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ.अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा.योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

## प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे विद्यार्थ्यांकडून ई-कचरा संकलन मोहीम

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाचा संदेश देण्यासाठी प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांच्या सहभागातून ई-कचरा संकलन मोहिमेचे आयोजन करण्यात आले.**




आजच्या डिजिटल युगात मोबाईल, संगणक, चार्जर, बॅटरी आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर वाढत असताना त्यातून निर्माण होणाऱ्या ई-कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे ही काळाची गरज बनली आहे.या मोहिमेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ई-कचऱ्याचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम आणि त्याचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

विद्यार्थ्यांनी घरातून तसेच परिसरातून ई-कचरा संकलित करून या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.'ई-कचरा योग्य ठिकाणी, पर्यावरण सुरक्षित आपल्या हाती' हा संदेश या मोहिमेतून देण्यात आला.ई-कचऱ्यामध्ये असलेल्या घातक घटकांमुळे माती, पाणी आणि मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.तसेच ई-कचऱ्याचा पुनर्वापर, पुनर्प्रक्रिया (Recycling) आणि जबाबदार विल्हेवाट यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाप्रती संवेदनशीलता, सामाजिक जबाबदारी आणि संसाधनांचा सुयोग्य वापर करण्याची वृत्ती विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

'कचरा नव्हे, योग्य व्यवस्थापनातून संसाधन' ही मूल्याधिष्ठित संकल्पना विद्यार्थ्यांनी आत्मसात केली.

शालेय शिक्षणासोबतच पर्यावरणपूरक सवयींची जोपासना करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.शाळेच्या व्यवस्थापनाने, प्राचार्यांनी आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक केले.ई-कचरा संकलन मोहीम विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव रुजविणारी आणि हरित भविष्याच्या दिशेने पाऊल टाकणारी ठरली.


Who Needs
Bone Density
CheckUp ?
Women After 40s
Long Sitting Jobs
Previous Fractures
Long Term Steroids Use
People With Vitamin D Deficiency
Consult with our experts now!
020-67313000 / +91 98220 55986
Sainath Hospital, Sant Nagar, Sector no. 4, Moshi Pradhikaran, Pune - Nashik Highway, Pune 412105
SAINATH HOSPITAL
Assuring Quality Care
Center Of Excellence For Trauma & Joint Replacement Surgery
www.sainathhospital.com